दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र • शनिवार दि.२३ नोव्हेंबर २०२४ • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक -९० • पाने ४ • किंमत ४ रुपये

## महाराष्ट्रात परिस्थिती पाहता प्रहारचा मुख्यमंत्री होऊ शकतो

**अमरावती (वृत्तसंस्था)**-राजकारणात काहीही होऊ शकते. झारखंडमध्ये एक आमदार मुख्यमंत्री होऊ शकतो. राज्यातील परिस्थिती बघता प्रहारचा मुख्यमंत्री होऊ शकतो, असे वक्तव्य प्रहारचे नेते बच्चू कडू यांनी केले आहे. तर महाविकास आघाडीमधील पक्ष निवडणुकीनंतर एक राहणार नाही, त्यांना आमच्यासोबत यावे लागेल, असे त्यांनी बोलताना म्हटले आहे.दरम्यान बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, मतदानाचा टक्का वाढला आहे. त्याला विविध कारणे आहेत. निवडणुकीत लाडक्या बहीण योजनाचा परिणाम दिसेल. त्याच हिशोबाने सरकारने योजना आणली होती. राज्यात लहान पक्ष आणि अपक्ष सरकार बनविणार आहेत. त्यामुळे महाविकास आघाडी किंवा महायुतीला पाठिंबा द्यावा लागेल.बच्चू कडू म्हणाले की, आमचे १७ मुद्दे आहेत. हे मुद्दे घेऊन आम्ही समोर जात आहोत. महाविकास आघाडीतील कुठले पक्ष एकत्र राहणार नाही त्यांना आमच्यासोबत यावे लागेल. आम्ही सत्ता स्थापन करणार हे सुर्यप्रकाशा इतके सत्य आहे. सत्ता आम्ही स्थापण करु बाकीच्या लोकांना आम्हाला पाठिंबा द्यावा लागेल. कुणाची सत्ता येईल हे चित्र दिसत नाही अन् आमच्याशिवाय राज्यात सत्ता येईन् असे होऊच शकत नाही, विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर प्रहारचे नेते बच्चू कडू यांनी हा दावा केला.

### छोटे पक्षच किंगमेकर ठरणार-महादेव जानकर
# पाठिंबा हवा असल्यास मंत्रिमंडळात सामील करण्याची दोन्ही आघाड्यांसमोर अट

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे. सत्ता स्थापन करण्यासाठी राजकीय पक्षांकडून संख्याबळाची जमवाजमव केली जात आहे. यंदाच्या निवडणुकीत छोटे पक्ष आणि अपक्षांना महत्व राहणार आहे. अशात राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी छोटे पक्षच किंगमेकर ठरणार असल्याचे म्हटले आहे. तसेच रासपचा पाठिंबा हवा असल्यास मंत्रिमंडळात सामील करावे, अशी अट देखील महायुती आणि महाविकास आघाडीसमोर ठेवली आहे.

महादेव जानकर एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रातील तमाम मतदार बंधू-भगिनींचे आभार मानतो. लोकशाहीच्या उत्सवामध्ये मतदारांचा टक्का वाढल्यामुळे अभिनंदन करतो. हा वाढलेल्या टक्क्यामुळे परिवर्तन होण्याची शक्यता असू शकते. मागील विधानसभा निवडणुकीत एक आणि वरच्या सभागृहात एक असे आमचे दोन आमदार होते. पण आता आमचे दोनाचे चार, चाराचे सहा होतील. जनतेचा कौल शेवटी, त्यांच्या हातात आहे. राष्ट्रीय समाज पक्षाला चांगले यश मिळेल, असा मला विश्वास आहे.

कोणासोबत जाणार यावर बोलताना महादेव जानकर म्हणाले, मेजॉरिटी महाविकास आघाडी किंवा महायुतीला असेल तर आमचा कोणाला विरोध असेल असे नाही. आम्ही दोघांसोबतही जायला तयार आहोत. सध्यातरी ५०-५० टक्के दोघांची शक्यता आहे. आम्ही सध्या महायुती किंवा महाविकास आघाडी बरोबर नाही. आम्ही छोटे पक्ष असल्यामुळे किंगमेकरची भूमिका निभावणार आहोत.महादेव जानकर म्हणाले की, आम्हाला महाविकास आघाडी किंवा महायुतीकडून कोणाचे निमंत्रण किंवा फोन आलेला नाही आणि आम्ही बिन बुलाय कोणाकडे जाणार नाही. आम्हाला मंत्रिमंडळात भागीदारी पाहिजे. आमची इच्छा आहे, आमचे जर १२ आमदार आले तर १२ चे १२ कॅबिनेट मंत्री झाले पाहिजे. आणि जर दोघांना वाटले तर मुख्यमंत्रीपण आमचा पक्षाचा झाला पाहिजे. त्यांनी हे मान्य केले, तर आम्ही त्यांचे स्वागत करू. तुम्ही आम्हाला सपोर्ट करावा, अशा अटी महादेव जानकर यांनी ठेवल्या आहेत.



## ॲड माधव जाधव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करा-खा.सोनवणे

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी परळीत झालेल्या निवडणुकी दरण्यात प्रकरणात लक्ष वेधत आपली प्रतिक्रिया दिली आहे त्यांनी म्हटले आहे कि,



परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ड. माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. याच परिसरात उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सुरक्षा रक्षकांनाही हल्लेखोरांकडून दमदाटी करण्यात आली. हा प्रकार पोलीस यंत्रणेसमोर घडूनही अद्यापपर्यंत हल्लेखोरांवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. उलट, आकसापोटी उमेदवारांच्या नातेवाईकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. हा पक्षपातीपणा खपवून घेतला जाणार नाही.

बीड पोलीस अधीक्षक साहेबांना माझे आवाहन आहे की, ड. माधव जाधव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी. अन्यथा, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, व त्याच्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी पोलीस अधीक्षकांवर असेल. अशी प्रतिक्रिया बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी दिली आहे.

### सांगली एमआयडीसीतील केमिकल कंपनीत वायू गळती
## उपाचारादरम्यान ३ महिलांचा मृत्यू;६ जणांची प्रकृती गंभीर

**सांगली । प्रतिनिधी**

सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यातील शाळगावमधील एमआडीसीमधील म्यानमार केमिकल कंपनीमधून मोठ्या प्रमाणावर वायूगळती झाल्याची माहिती समोर आली आहे. यात उपचारादरम्यान ३ महिलांचा मृत्यू झाला आहे.या विषारी वायूमुळे अनेक लोक गंभीर झाले असून यातील ६ लोकांना कराडच्या सह्याद्री हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. काल (२१ नोव्हेंबर) सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास घटना घडली. यामध्ये गंभीर प्रकृती असणाऱ्या दोन महिला सुचिता उथळे अन् नीलम रेठरेकर यांच्यासह एका महिलेचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर सह्याद्री हॉस्पिटलमध्ये ६ जणांवर आयसीयूत उपचार सुरू आहेत.

विषारी वायू एमआयडीसी परिसर आणि शेजारच्या वस्तीवर पसरला. यामुळे श्वास घेताना अडचण, डोळ्यात जळजळ आणि उलट्या होऊन गंभीर त्रास होऊ लागला. परिसरातील लोकांत घबराट पसरली आणि लोक जीव मुठीत घेऊन धावू लागले. घटनेची माहिती मिळताच माजी आमदार देशमुख, कडेगावचे तहसीलदारांसह पोलिस निरीक्षकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर संबंधित अधिकार्यांना सूचना देण्यात आल्या. गळती झालेला वायू कोणता होता, याबाबत अधिक माहिती मिळू शकली नाही.यासंदर्भात तज्ज्ञांच्या मदतीने तपास सुरू करण्यात आला आहे. वायुगळतीमुळे बोंबाळेवाडी, रायगाव आणि शाळगाव परिसरातील नागरिकांना त्रास झाल्याचे समजते. नागरिकांनी दक्षतेचा उपाय म्हणून मास्कचा वापर केला. या दुर्घटनेमुळे बोंबाळेवाडी, शाळगाव व रायगाव येथील नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. या दुर्घटनेची चौकशीची होऊन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## माजी पंचायत समीती सदस्य रामभाऊ घोडके यांच निधन



**केज (प्रतिनिधी)**-तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी व माजी पंचायत समीती सदस्य रामभाऊ बंडोबा घोडके याचं २२ नोव्हेंबर शुक्रवार रोजी सकाळी ९ वाजता वृध्दपकाळाने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी जावाई नातावंडे अशा मोठा परीवार आहे.पत्रकार महादेव गायकवाड यांचे ते सासरे होते.

## घनसावंगी विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**जालना । असलम कुरेशी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १०० घनसावंगी विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी प्रक्रिया दि. २३ नोव्हेंबर २०२४ शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था राजेगाव रोड, घनसावंगी येथे होणार असून मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज आहे.



घनसावंगी विधानसभा मतदार संघाची मतमोजणी एकुण २९ टेबलवर पार पडणार आहे. त्यामध्ये १४ टेबलवर ईव्हीएम द्वारे, १० टेबलवर टपाली मतदान, ५ टेबलवर ईटीपीबीएस, इनकोअर अशा प्रकारे मतमोजणीची तयारी करण्यात आलेली आहे. सदरील मतमोजणीसाठी एका टेबलवर मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहाय्यक, सुक्ष्म निरीक्षक व वर्ग ४ चे कर्मचारी असे एकुण ११६ अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या व्यतिरीक्त ६० अधिकारी व कर्मचारी इतर मतमोजणी विषयक कामकाजासाठी नियुक्त आहेत. सकाळी ८.०० वाजता टपाली मतदानाची मतमोजणी सुरुवात होणार असून ईव्हीएम द्वारे १४ टेबलवर मतमोजणीच्या एकुण २६ फेऱ्या होणार आहेत. या मतमोजणी प्रक्रियेकरिता १३० पोलीस अधिकारी व कर्मचारी, २४ राज्य राखीव पोलीस दल, ४० होमगार्ड तसेच स्टाँग रुमकरिता २४ बी.एस.एफ. चे जवान बंदोबस्तासाठी तैनात आहेत.

### पोलिसांचा पक्षपातीपणा
## खा.सोनवणेंकडून 'त्या' हल्लेखोरांच्या अटकेची मागणी पोलीस अधिक्षकांना केले अवाहन

**बीड । प्रतिनिधी**

परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. पोलीसांसमोर हल्ला होऊनही गुन्हा दाखल केला नसून पोलिसांकडून पक्षपातीपणा सुरू आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करून हल्लेखोरोंना अटक करावी, असे अवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी पोलिस अधिक्षकांना केले आहे.



प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. याच परिसरात उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सुरक्षा रक्षकांनाही हल्लेखोरांकडून दमदाटी करण्यात आली. हा प्रकार पोलीस यंत्रणेसमोर घडूनही अद्यापपर्यंत हल्लेखोरांवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. उलट, आकसापोटी उमेदवारांच्या नातेवाईकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. हा पक्षपातीपणा खपवून घेतला जाणार नाही. बीड पोलीस अधीक्षक यांना माझे आवाहन आहे, ड.माधव जाधव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी. अन्यथा, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, व त्याच्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी पोलीस अधीक्षकांवर असेल, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. शिवाय परळीत मतदान सुरू असताना अनेक ठिकाणी मतदारांनाही दमदाटी करण्याचे प्रकार घडले असून पोलीसांच्या अंगावरही विरोधकांचे कार्यकर्ते धावून गेलेले आहेत. असे असताना पोलीसही शांत आहेत. येणाऱ्या काळात हे असेच वाढत जाऊन लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी बघ्याची भुमीका न घेता दोषींवर निपक्षपातीपणे कारवाई करावी, असेही म्हटले आहे.

# काशी विश्वनाथ राजेश पवारांना तारणार आजच्या निकालाकडे सर्वांच्या नजरा

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

मतमोजणीला अवघे काही तास उरलेले आहेत त्यामुळे सर्वांचं लक्ष लागलं आहे ते महाराष्ट्राच्या राजकारणाकडे नेमकं सरकार कोण बनवणार, कोणाला बहुमत मिळणार याकडे.



नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघासाठी निवडणुका बुधवारी पार पडल्या,जिल्ह्यातील १६५ उमेदवारांचे भविष्य मतपेटीत बंद झाल आहे.आता सर्वांच्या नजरा उद्या लागणाऱ्या निकालाकडे असून, कोण निवडून येणार आणि कोणाचा या निवडणुकीत पराभव होणार या अंदाजाने मात्र अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघांपैकी नायगाव विधानसभा मतदारसंघात यंदाच्या निवडणुकीत मोठे घमासान पाहायला मिळाले. येथील विद्यमान आमदार राजेश पवार यांच्या विरोधात काँग्रेसकडून मीनल खतगावकर यांनी कडवं आव्हान दिलं होतं.वंचित बहुजन आघाडीचे डॉ.माधव विभुते यांनीही जोरदार उडी प्रचारामध्ये घेतली होती.यासोबतच जरांगे फॅक्टर देखील सत्ताधारी आमदारांच्या विरोधात होता.एकंदरीत या मतदारसंघातील अगदी बोटावर मोजण्याइतके भाजपचे पदाधिकारी वगळता पक्षातील व युतीमधील अनेक मंडळीनी राजेश पवार यांच्या प्रचारात अजिबात सक्रियता दाखवली नाही.काँग्रेसच्या डॉ.मीनल खतगावकर यांनी आपल्या प्रत्येक सभेतून राजेश पवार यांच्यावर जोरदार हल्ला चढवत रस्ते आणि पुलांच्या कामात टक्केवारी घेतल्याचा आरोप केला मात्र त्याला प्रत्युत्तर देताना राजेश पवार यांनी अतिशय सॉफ्ट भूमिका घेत प्रत्येक गावागावातील बैठकांमध्ये झालेल्या विकास कामाचीच माहिती मतदारांना देत आगामी काळातल्या होणाऱ्या विकास कामावरच भर दिला.या मतदारसंघातील अनेक राजकीय पुढारी एकवटत संपूर्ण ताकद त्यांनी राजेश पवार यांच्या विरोधात पणाला लावलेली पाहायला मिळाली.मात्र राजेश पवार यांनी मागील कार्यकाळात मतदार संघातील जनतेसोबत थेट संबंध ठेवल्याने कदाचित त्यांना या निवडणुकीत फायदा होणार असल्याचा अंदाज आता व्यक्त होत आहे.या निवडणुकीत विरोधकांनी त्यांच्यावर बेछुट आरोप केले. मात्र आरोपाला आरोपानेच प्रत्युत्तर न देता त्यांनी केलेल्या विकास कामांचा पाढाच जनतेसमोर ठेवत पुढच्या टर्म मध्ये सिंचन शेती विषयक कामांना प्राधान्य देणार असल्याच्या भावना जनतेपुढे मांडल्या. जिथे कित्येक वर्षांपासून रस्त्यासाठी टाहो फोडला जात होता त्याठिकाणी आमदार राजेश पवार यांनी विशेष प्रयत्न करून कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून दिला.त्यामुळे राज्यात अस्थिरता निर्माण केलेल्या भाजप महायुतीच सरकार पुन्हा येवो की न येवो मात्र मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदललेला व्यक्ती आम्हाला विधानभवनात पुन्हा पाठवायचा असा चंग नायगाव विधानसभा मतदारसंघात अनेकांनी बांधल्याने निवडणुकीत घामासम होऊनही कौल मात्र राजेश पवार यांच्याच पारड्यात दिला असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.राज्यातलं सत्ता समीकरण कसही असलं तरी ते काही आमच्या हातात नाही आम्हाला इथे राजेश पवार हेच आमदार म्हणून पाहिजे अशा भावना मतदारसंघात निवडणुकीनंतर अनेकांनी व्यक्त केल्या आहेत.मागील अडीच वर्षात त्यांनी मतदारसंघात कोट्यांशी रुपयांचा निधी सरकारकडून खेचून आणत रस्त्याच जाळ विणलं.त्यांच्या कार्यकाळातील शेवटच्या टप्प्यात मतदारसंघातील अनेक भाविकांना त्यांनी काशी दर्शन घडवलं.कदाचित ही यात्रा देखील त्यांच्यासाठी फायदेशीर ठरली असावी.शेवटी निकालाची उत्सुकता सर्वांना लागून आहेच.अवघ्या काही तासांमध्येच संपूर्ण निकाल स्पष्टपणे मतदारांच्या हातात येणार आहे.त्यामुळे नायगाव विधानसभा मतदारसंघात त्यांना एवढा विरोध होऊनही राजेश पवार यांच्या बाजूने मतदारांनी कौल दिल्याचं उद्या जर स्पष्ट झालं तर केवळ जनसामान्यांच्या मनातला आमदार म्हणून त्यांचा येणाऱ्या काळात नावलौकिक होईल हे देखील तितकंच स्पष्ट होणार आहे.त्यामुळे नेहमी काही ना काही लोकाभिमुख योजना राबवणारे राजेश पवार यांना काशि विश्वनाथ नक्कीच तारतील अशा भावना आता व्यक्त होत आहेत.राज्यात बेरोजगारी,वाढती महागाई,मराठा आरक्षण,संविधान बचाव,लाडकी बहिण योजना, शेतमालाला भाव असे अनेक मुद्दे घेऊन प्रचारात उतरलेल्या महायुती आणि महाविकास आघाडीतील नेत्यांनी एकमेका विरोधात आरोप - प्रत्यारोप केला शिवाय अनेक योजनांची घोषणाही त्यांच्याकडून करण्यात आली. मतदारांनी आता नेमका कल कोणाला दिलाय हे येत्या काही तासांमध्ये स्पष्ट होणार आहे.

संपादकीय

# समाधानाचा स्पर्श



'आनंदाचे डोही आनंद तरंग' या अभंगातून मनाच्या स्थितीचे वर्णन संत तुकाराम महाराज म्हणतात. ते सांगतात, माझे मन हे जणू काही आनंदाचा डोहच झाले आहे. आनंदाच्या अनेक प्रकारच्या लाटा त्यावर तरंगत असतात. माणसाचं मन ही फार मोठी दैवी देणगी ईश्वराने मानवाला दिली आहे.

शोधलं तर ते निश्चितपणे सापडतं, हे जीवनातील सूत्र मी लक्षात ठेवलं आहे. १७ मार्च १९७६ ला माझं लग्न झाल्यानंतर मी काय करू, हा मोठा प्रश्न मी घरातच लहान मुलांचं बालमंदिर चालवून सोडविला. मी या लहान लहान गोळ्यांना घडविण्यात आनंद शोधत गेले. या बालमंदिरातील बालगोपालांच्या चेहऱ्यावरील निरागस भाव, त्यातील आनंदाची अनुभूती मी मिळवत गेले. त्यांच्या बोबड्या बोलण्यातला प्रार्थनेचा आनंद, त्यांच्यातील एकमेकांशी भांडण्याचा आनंद मी त्यांच्या बरोबरीने घेत त्यांना घडवत गेले.

स्वतःभोवती असलेलं सुंदर जग करण्यासाठी आधी स्वतःमध्ये आनंदी असे जग तयार करणे जसे गरजेचे असते, दुसऱ्यांना हसवत हसवत स्वतःमध्ये खूश राहणे गरजेचे असते. अनेक वादळे व वेडीवाकडी वळणे ही मनातल्या मनात ठेवून आनंदी चेहरा झळकावणं गरजेचं असतं. दुःखाच्या विचारात पडून खंत करण्यापेक्षा आनंद कसा मिळेल, याचे कारण शोधायचे असते. कारण 'शोधलं तर ते निश्चितपणे सापडतं' हे साधं सरळ सूत्र आहे. ते स्वीकारलं तर आनंदाचा शोध घेणं सोपं होतं.

जीवनातला खरा आनंद कशात आहे, तुमच्यासाठी आनंदाचे स्रोत कोणते, तुम्हाला कोणती गोष्ट सर्वांत आनंदी बनविते, कोण तुम्हाला आनंदी बनविते, हे शोधायला हवे. आनंद चराचरात भरलेला आहे. झाडे लावताना, त्यांच्याशी संवाद साधतांना, सुगंधी फुलांकडे, त्यांच्या रंगांकडे, त्यांच्या सुंदर आकारांकडे त्यांची अभूतपूर्व रचना बघताना आनंद मिळतो.

शीतल चंद्राकडे एकटक बघताना, काही वेळ पावसात भिजताना, मनसोक्त जेवण करून पोटोबाला शांत करताना, गच्चीत कुंड्या व त्यातील छोट्या रोपट्यांना पाहाताना, त्यांच्यावर मनसोक्त विहार करणाऱ्या फुलपाखरांना बघताना, आईवडिलांची सेवा करताना, सासरी रमलेल्या मुलींशी संवाद साधताना, प्रवास करताना, सहप्रवाशासी संवाद साधताना मी आनंद शोधते.

आपलं घर स्वच्छ ठेवणे, घरातील कामे करणे, यातून मला वेळेचा सदुपयोग केल्याचाही आनंद मिळतो. मला सूर्योदय पाहायलाही आवडते. कारण सूर्योदय हा जीवनातील नैराश्यरूपी दुखण्याला बाजूला ठेवत नवचैतन्याची, नवीन सुरुवात याची अनुभूती देत असतो. माझे पती दरवर्षी वाढदिवसाच्या दिवशी कोणताही डामडौल न करता अनाथ व निराधार मुलांच्या आधारश्रमाला मदत करण्याचा आनंद घेतात. त्यांच्या या आनंदातच माझाही आनंद असतो. जुन्या हिंदी चित्रपटातील लोकप्रिय गाणी, मराठी भावगीतं ऐकण्याचाही आनंद मी घेते. आनंदाचे अनेक प्रकार वाचण्यात आले. खरा आनंद, आत्मिक आनंद, अनोखा आनंद आणि वेगळा आनंद या सर्वांचा मी शोध घेत असते.

मला जीवनाचं मूल्य समजलं ते राजेश खन्नाच्या 'आनंद' या चित्रपटातील नायकाच्या भूमिकेत. समोर साक्षात मृत्यू दिसत असतानाही हा नायक स्वतःबरोबरच सगळ्यांना हसवत असतो. शेवटी 'जिंदगी कैसी है पहेली' सोडवत असतो. कसल्याही फारशा अपेक्षा न ठेवता जगणं म्हणजेच आनंद लुटणे, अशी साधीभोळी व्याख्या जीवनातील आनंदाविषयी केली आहे, बस्स..

# सुक्ष्मवृतीने अक्षर शोघण्याची कला यांच्याच ठायी

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'जागतिक अंध दिन' किंवा 'पांढरी काठी सुरक्षा दिन' म्हणून साजरा केला जातो, हा एक जागतिक कार्यक्रम आहे ज्याचा उद्देश अंधत्व आणि दृष्टीदोषाकडे लक्ष वेधण्यासाठी आहे. तुम्ही रस्ता ओलांडताना, चालताना संपूर्ण पांढर्या रंगाची किंवा वरून दोन तृतीयांश पांढरा आणि खाली एक तृतीयांश लाल रंग असलेली काठी घेऊन चालणारे अनेक लोक पाहिले असतील. हे सर्व लोक देसी डोळे परी निर्मिसी त्यापुढे अंधार अशी निसर्गाची अजब निर्मिती असलेले अर्थात अंध असतात. या दिवशी नॅब (नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड) या संस्थेच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. ऑक्टोबरचा दुसरा गुरुवार हा जागतिक दृष्टी दिन आहे, आपले डोळे आणि दृष्टी सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करण्याची, दृष्टीदोष आणि अंधत्वाबद्दल जागरुकता वाढवण्याची आणि नेत्र आणि दृष्टी काळजीला प्रोत्साहन देण्याची संधी.

२००० पासून जागतिक दृष्टी दिन साजरा केला जात आहे आणि आता जागतिक आरोग्य संघटनेच्या बरोबरीने अंधत्व प्रतिबंधक आंतरराष्ट्रीय एजन्सीद्वारे समन्वयित केले जात आहे. हे सुरुवातीला लायन्स क्लब इंटरनॅशनल फाऊंडेशनच्या साइटफर्स्ट मोहिमेचा भाग म्हणून पाळण्यात आले. या दिवशी नेत्र तपासणी किंवा तुमच्या डोळ्यांची काळजी घेण्याचे वचन द्या आणि इतरांना तसे करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी सोशल मीडियावर शेअर करा. या जागतिक दृष्टी दिनाचे आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) चे उद्दिष्ट १० दशलक्ष डोळ्यांच्या चाचण्यांपर्यंत पोहोचणे हे आहे आणि नेत्र निगा सेवांसाठी जागरुकता निर्माण करण्याचे वचन दिले आहे. या वर्षी २०२४ मधील जागतिक आरोग्य दिनाची थीम 'माय हेल्थ, माय राइट' अशी आहे आणि आम्ही अधिक सहमत होऊ शकलो नाही. आरोग्य सेवा मिळणे हा मूलभूत मानवी हक्क आहे. चढउतार, दगडधोंडे, खाचखळगे, कुत्रे, मांजर असे प्राणी, बसलेली-झोपलेली माणसे असे काठीच्या परीक्षेत्रात येणारे सगळेच अडथळे पांढर्या काठीचा उपयोग करून पार करता येतात. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पहिल्या महायुद्धानंतर डॉ. रिचर्ड व्हुव्हर यांनी सर्वप्रथम अंधांना चालण्या-फिरण्यासाठी सोयीची पडेल अशी विशिष्ठ स्वरूपाची काठी तयार केली. ती काठी हुव्हर केन म्हणून ओळखली गेली. १९२१ मध्ये ब्रिस्टलचे फोटोग्राफर जेम्स विंग्ज यांना अपघातात अंधत्व आले. तेव्हा गडद रंगांच्या काठय़ा घेऊन फिरताना वाहनचालक आणि इतर डोळस व्यक्तींना दुरून ती ओळखणे कठीण जात होते. हे लक्षात आल्यानंतर अंधारातही सहजपणे दिसेल, असा पांढरा रंग आपल्या काठीला दिला. डोळा असूनही नसल्यासारखा असतो. पांढरी काठी आम्हांस जणू आमचा डोळाच. कुणाच्याही आधाराशिवाय मुक्तपणे संचार करण्यासाठीचा आत्मविश्वास. ही पांढरी काठी म्हणजे अंधाची आजची जीवन संजीवनी व जीवनसाथी आहे. जागतिक पांढरी काठी दिनानिमित्त लोकांनी अंधांना रस्ता ओलांडताना मदत करणे, साहित्य पुरवून यामध्ये जनजागृती करावी. यामध्ये लोकसहभाग खूप आवश्यक आहे. अंधासाठी पांढरीकाठी म्हणजे त्यांच्या करिता जीवनरेखाच आहे. तुम्हा-आम्हाला डोळे आहेत, चांगली दृष्टी आहे. त्याद्वारे आपण साऱ्या सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेऊ शकतो. मनमुराद आनंद लुटू शकतो. पण ज्यांना डोळे नाहीत, दृष्टी नाही, त्यांचा कधी आपण विचार केला आहे का? तात्पर्य म्हणजे त्यांचा देखील आपण सामाजिक कर्तव्यबुद्धीने विचार करायला हवा. कारण तेही समाजाचे अविभाज्य घटक आहेत. दृष्टिहीन लोकांना आपल्या सारखंच जग न्याहाळता यावं आणि त्यांनाही डोळसपणे जीवनदर्शन करता यावं व त्यांना एक नवी जीवनदृष्टी मिळावी, या दृष्टिकोनातून आपण सर्वजण 'नेत्रदान' करण्याचा संकल्प करू या.




प्रविण बागडे
नागपूर
९९२३६२०९१९

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अंध दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. पांढरी काठी घेऊन रस्त्यावर चालणारी व्यक्ती ही अंध आहे याचं सामाजिक भान ठेवून त्याला मदतीचा हात देणं, हा एक कर्तव्याचा भाग आहे, हे लक्षात ठेवावे. जागतिक पातळीवर दृष्टिहीन लोकांची संख्या पाहता, त्यातील २० टक्के लोक एकट्या भारतात आहेत. अशा गंभीर जागतिक प्रश्नावर रामबाण उपाय म्हणजे प्रत्येक सुजाण नागरिकाने नेत्रदान करण्यास स्वयंस्फुर्तीने पुढे येणं व ही काळाची गरज देखील आहे. जगात सुमारे १८० दशलक्ष लोक दृष्टिहीन असून, त्यातील जवळ जवळ ३५ दशलक्ष लोक भारतात आहेत. जगातील सुमारे ९० टक्के अंध हे विकसनशील देशांमध्ये राहणारे आहेत. वार्धक्य, बदलती जीवनशैली, गरिबी, निरक्षरता, मानवी विकासाचा अभाव, सामाजिक मागासलेपणा, अत्याधुनिक वैद्यकीय साधन सामुग्रीची कमतरता या प्रमुख गोष्टी अंधत्वाच्या वाढत्या प्रमाणाला कारणीभूत आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणात नमूद केलं आहे. जागतिक पातळीवर 'अंधत्व' या समस्येवर मात करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय अंधत्व प्रतिबंधक संस्था (आयएपीबी) आणि जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्युएचओ) यांनी संयुक्तपणे '२०२० व्हीजन' हा कार्यक्रम राबवून, प्रत्येकाला 'दृष्टीचा अधिकार' ही संकल्पना साकार करण्यात पुढाकार घेतला आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी भारतासह ४० देशांनी योगदान देण्याची तयारी दर्शविली, ही उल्लेखनीय बाब आहे. खरं तर, भारताच्या खालोखाल दक्षिण आफ्रिका व चीन या देशद्वयामध्येही अंधत्वाची समस्या लक्षणीय आहे. वैश्विक स्तरावर जनजागृती करून अंधत्वाच्या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी प्रभावी व ठोस उपाययोजना केल्या जात आहेत. जगातील लहानमोठ्या सर्वच देशांनी वैश्विक कर्तव्य या नात्याने या मोहिमेला यशस्वी करण्यात कटिबद्ध व्हावे, हे अपेक्षित आहे. प्रत्येक नेत्रहीन व्यक्तीला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्याच्या मनातील अंध म्हणून न्युनगंडाची भावना घालविण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकीच्या नात्याने प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य सरकारनेही नेत्रचिकित्सा व कॅटरॅक्टसवर अद्ययावत उपचारपद्धती या बाबींवर भरीव आर्थिक तरतूद करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना नवी दृष्टी देण्यासाठी ठोस पावलं उचलावीत. शासनयंत्रणेने अंधत्व मिटविण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास अंधत्व निर्मूलन अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकते, असे जागतिक आरोग्य संघटनेचे मत आहे.

अंधांसाठी प्रत्येकाने सहानुभूतीपेक्षा स्वानुभूतीची भूमिका अवलंबिली पाहिजे. स्वतःचे डोळे पट्टीने बांधून काही वेळ जगायची अनुभूती घ्यावी, म्हणजे त्यातील गांभीर्य कळून येईल. अंध, अपंग, मतिमंद वा मूकबधिरांना गुणदोषांसह स्वीकारून त्यांना आपलसं करणं यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे. अंधांना सामाजिक जाणिवेतून रस्ता ओलांडताना मदत करणे, रेल्वे-बसमध्ये बसण्यास आपली जागा देणे, त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधणे, जीवनाशी निगडीत विभिन्न विषयांवर त्यांच्याशी गप्पा मारणे, त्यांचे मनोबल वाढविणे या गोष्टी आपण दैनंदिन जीवनात वावरताना करायला पाहिजेत. इतकेच नव्हे तर, एक पाऊल पुढे टाकून एखाद्या अंध व्यक्तीशी डोळस व्यक्तीचा विवाह करून देऊन त्याचे अंधकारमय जीवन प्रकाशमय करणं हे पुण्यकर्म आपण आपल्या जीवनात करू शकतो. आजच्या घडीला अंधत्वाची समस्या मिटविण्यासाठी नेत्रदान ही मोहीम लोक चळवळ होणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण मानव म्हणून जीवंतपणी अनेकप्रकारे पुण्यकर्म करीत असतो, हे कौतुकास्पद आहे. तथापि, मृत्यूनंतरही नेत्रदान करून आपण आणखी एका पुण्यकर्मात भर टाकू शकतो. म्हणून ही संधी दवडू नका, यासाठी नेत्रदानाकरिता आधीच इच्छापत्र भरून द्या, जेणेकरून आपल्या मृत्यूनंतर आपली नेत्रं दुसऱ्या अंधव्यक्तीला दान देऊन त्याला नवीन दृष्टी देता येईल. चला तर, नेत्रदान करून अंधत्वाची समस्या मिटविण्यास वचनबद्ध होऊ या. नियतीने डोळ्यातल्या प्रकाश ज्योती हिरावून घेत ज्या अंध बांधवांचे आयुष्य अंधकारमय करून टाकले आहे, त्यांच्या जीवनात यंदाची दिवाळी आशेचा किरण आणेल अशी आपण सर्व प्रार्थना करू या!

# उद्योगाचे घरी देवता

'लोकसत्ता' सातत्याने कारखानदारीचे (मॅन्युफॅक्चरिंग) महत्त्व अधोरेखित करीत आला आहे. सेवा क्षेत्र कितीही वाढले, नवउद्यामींचा कितीही गुणाकार झाला, सेन्सेक्स अगदी गगनास जरी भिडला तरी कारखानदारीचे मोल या कशास नाही. हे सर्व घटक हे अर्थव्यवस्थेस पूरक. न्याहारी ज्याप्रमाणे चौरस भोजनास पर्याय ठरू शकत नाही तद्वत या सर्व क्षेत्रांची वाढ कारखानदारीची जागा घेऊ शकत नाही. तथापि या सत्याकडे अलीकडे दुर्लक्ष करण्याचा नवाच 'उद्योग' अनेक जण करताना दिसतात. त्यात सत्ताधारी मग्न असल्यास ते एक वेळ समजून घेता येईल. कारण त्या बिचाऱ्यांसाठी 'जे बरे, ते खरे' असे वास्तव असते. तेव्हा कारखानदारीपेक्षा हा वर्ग नवनव्या उगवत्या क्षेत्रांचे गुणगान करणार यात नवल नाही. परंतु अर्थव्यवस्थेचे अभ्यासकही कारखानदारीपेक्षा सेवादी क्षेत्रांच्या घोडदौडीचे कौतुक करण्यात रममाण दिसतात. ही स्वत:ची फसवणूक. नुकत्याच जाहीर झालेल्या 'इंडेक्स ऑफ इंडस्ट्रियल प्रॉडक्शन'मुळे (आयआयपी) ही फसवणूक चव्हाट्यावर येते. हा निर्देशांक औद्योगिक उत्पादनाचा माग ठेवतो. कारखानदारीच्या कोणत्या क्षेत्राने कशी कामगिरी केली, कोण मागे आहे, कोण पुढे इत्यादी तपशील या निर्देशांकावरून लक्षात येतो. त्यात देशातील समग्र कारखानदारीचे प्रतिबिंब पडत असल्यामुळे खरे तर सेन्सेक्सपेक्षाही अधिक महत्त्व या 'आयआयपी'स असायला हवे. पण वास्तव तसे नाही. केवळ भांडवली बाजाराचा निर्देशांक असलेला सेन्सेक्स हा अधिक माध्यमस्नेही असल्याने आणि त्यात अनेकांचे हितसंबंध असल्याने त्यास अधिक महत्त्व दिले जाते. परिणामी आयआयपी दुर्लक्षित राहतो. नुकताच प्रसृत झालेला ऑगस्ट २०२४चा 'आयआयपी' मात्र अर्थव्यवस्थेस खडबडून जाग आणत असून त्याकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.



याचे कारण गेल्या तब्बल २२ महिन्यांतील नीचांकी कामगिरी हा आयआयपी नोंदवतो. गेल्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात कारखानदारीच्या या निर्देशांकाने त्याआधीच्या वर्षीपेक्षा तब्बल १०.९ टक्के इतकी वाढ नोंदवलेली होती. म्हणजे गतसाली या काळात कारखाने मोठ्या जोमाने काम करत होते. त्या तुलनेत यंदा मात्र हा निर्देशांक उणे ०.१ टक्के इतका नोंदवला गेला. म्हणजे वाढ सोडा; प्रत्यक्षात या कालखंडात देशात कारखानदारी आटली. सुमारे दोन वर्षांनंतर, म्हणजे ऑगस्ट '२२ नंतर, पहिल्यांदाच हा निर्देशांक इतका घसरला. त्या वर्षी या निर्देशांकातील घट ४.१ टक्के होती. आणि आता या वर्षी उणे. हे वास्तव धक्कादायक असून हे असे कसे झाले, याची चर्चा सुरू झाली आहे. सरकारच्या मते ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी झाल्याने हा निर्देशांक आटला. सरकारचे हे विनोदी विश्लेषण दोन घटकांच्या आधारे आहे. या काळात खचलेले खाणकाम आणि घटलेली वीज निर्मिती यामुळे या निर्देशांकावर परिणाम झाला, असा खुलासा सरकारतर्फे करण्यात आला. या महिन्यात खाण उद्योग साधारण चार टक्क्यांनी आकसला आणि वीज निर्मिती साडेतीन टक्क्यांनी कमी झाली. त्यामुळे हा निर्देशांक गडगडला, असे सरकारचे म्हणणे. त्यात तथ्य नाही असे नाही. पण ते अर्धे आहे. म्हणजे सरकारचे म्हणणे अर्ध-तथ्य ठरते. याचे कारण या काळात प्रत्यक्ष कारखानदारीही आकसली. त्यास पावसाचे कारण कसे लावणार? अतिवृष्टी झाली म्हणून कारखाने बंद पडत नाहीत की त्यामुळे औद्योगिक वापरावर परिणाम होत नाही. मोटारी तयार होत असतात, त्यांच्या सुट्या भागांची निर्मिती सुरू असते, सर्व औद्योगिक उत्पादनेही निर्माण होत असतात. तेव्हा पाऊस हे काही हा निर्देशांक घटीचे मुख्य कारण नव्हे. गतवर्षीच्या तुलनेत या काळात प्रत्यक्ष कारखानदारी जेमतेम एक टक्क्याने वाढली. केवळ वाढलेले पर्जन्यमान हेच जर हा निर्देशांक घसरण्याचे कारण असेल तर मग त्याआधी मार्च ते जुलै- म्हणजे पाऊस जोर धरायच्या आधीच्या- महिन्यांत या निर्देशांकाची कामगिरी नेत्रदीपक हवी. तसे झालेले नाही. यंदाच्या मार्च महिन्यापासूनच हा निर्देशांक घसरणीस लागलेला आहे असे उपलब्ध आकडेवारीवरून सहज ध्यानी येईल. या एप्रिलला सुरू झालेल्या आर्थिक वर्षाच्या पाचपैकी चार महिन्यांत हा निर्देशांक आकसला. एवढेच नाही तर गतवर्षीच्या एप्रिल-ऑगस्ट या काळात ६.२ टक्के इतका असलेला हा निर्देशांक यंदा मात्र ४.२ टक्के इतकाच नोंदला गेला. याचा अर्थ उघड आहे. केवळ अतिवृष्टी हे कारण यामागे असू शकत नाही. असे ठामपणे म्हणता येते याचे कारण २०१६ पासून या निर्देशांकाने इतकी घसरण पाहिलेली नाही. म्हणजे गेल्या आठ वर्षांत कधी अतिवृष्टी झालेली नाही, असे नाही.

म्हणजेच यातून आकसत चाललेली कारखानदारी दिसून येते. उद्योगांच्या राष्ट्रीय स्तरावरील पाहणीत दिसून आल्यानुसार आपल्याकडे कारखाने म्हटले की त्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचाच भरणा सर्वाधिक दिसून येतो. रोजगार निर्मिती आदींच्या अनुषंगाने या घटकाचे महत्त्व कोणीही अमान्य करणार नाही. पण तरीही हे क्षेत्र हे काही बड्या कारखान्यांस पर्याय असू शकत नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर पिंपरी-चिंचवड परिसराचे देता येईल. टाटा मोटर्सचा एक भव्य कारखाना त्या परिसरात आला आणि शेकड्याने लघु, सूक्ष्म उद्योग तेथे उभे राहिले. मोटारींचे सुटे भाग, त्यात वापरले जाणारे रबर/ प्लास्टिक आदींच्या वस्तू यांची निर्मिती लघु उद्योगांकडे गेली. म्हणजे भव्य कारखान्याच्या सावलीत अनेक लघु उद्योग वाढीस लागतात. त्यांची गरज निर्माण होते. म्हणून भव्य कारखानदारी महत्त्वाची. तथापि आपल्याकडील चित्र असे की आपल्या एकूण कारखानदारींतील ९६ टक्के इतका प्रचंड वाटा हा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा आहे. यातही तब्बल ९९ टक्के 'कारखाने' असे आहेत की ज्यातील कर्मचाऱ्यांची संख्या १० वा त्यापेक्षाही कमी आहे. हजार/ दोन हजार कर्मचाऱ्यांना सामावून घेणारे कारखाने अगदी नगण्यच दिसून येतात. थोडक्यात भव्य कारखानदारी तशी आपल्याकडे कमीच. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या वगैरे अर्थव्यवस्थेत हे असे का असावे?

त्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण आहे डोळ्यात येण्याची भीती. काहीही भव्य-दिव्य उभे राहते आहे असे दिसल्यावर त्या परिसरातील राजकीय 'ग्रामदेवता' वा त्यांचे अनुयायी त्याभोवती घिरट्या घालू लागतात. जेवढी गुंतवणूक मोठी, तितकी या ग्रामदैवतांची मागणी मोठी आणि तितकी त्या प्रमाणात त्यांना 'शांत' करण्याची किंमत अधिक. हे टाळण्यासाठी बरेच कारखानदार आपली उत्पादन आस्थापना अनेक लहान, लहान केंद्रांतून विभागतात. हे असे केल्याने ग्रामदेवता वक्री होण्याचे प्रमाण कमी होते हे खरे; पण त्यामुळे कारखान्यांच्या उत्पादन क्षमता आणि वाढीवरही परिणाम होतो. तसेच असे केल्याने कामगार संघटना आणि त्याबाबतची आव्हाने सांभाळणेही सोपे जाते. आपल्याकडे कामगार कायद्यांतील सुधारणा पुरत्या न झाल्याने आणि ज्या झाल्या त्यांची अंमलबजावणी पूर्ण ताकदीने होत नसल्याने गुंतवणूकदार मोठ्या गुंतवणुकीआधी दहा वेळा विचार करतात.या सगळ्याचा परिणाम आपल्या औद्योगिक विकासावर मोठ्या प्रमाणावर होत असून मंदावलेला औद्योगिक निर्देशांक हे त्याचे एक लक्षण. या लक्षणाकडे वेळीच लक्ष द्यायला हवे. मोठ्या कारखानदारीस, गुंतवणुकीस पर्याय नाही हे वास्तव पुन:पुन्हा लक्षात घ्यायला हवे. ''उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी'' हे केवळ गाणे घोकून चालणारे नाही. ते वास्तवात यायला हवे.

# पैठण रोडवरील नाल्याचे सौंदर्यकरण करणार;विकेंद्रित मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याची प्रशासक यांची सूचना

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

पैठण रोडवरील नाथ सिडस् कंपनीजवळून वाहणाऱ्या नाल्याचे सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे. यासाठी नाथ उद्योग समुहाने पुढाकार घेतला असून महापालिकेने त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. पालिकेचे प्रशासक जी. श्रीकांत यांच्या समोर नाल्याच्या सौंदर्यीकरणाबद्दल गुरुवारी सादरीकरण करण्यात आले. 'पिकनिक स्पॉट' म्हणून हा नाला विकसीत करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला.

महापालिकेच्या मुख्यालयात नाथ सिडस् तर्फे नाल्याचा विकास आणि सौंदर्यीकरणाबद्दल सादरीकरण पुणे येथील 'सुमन शिल्प' चे महेश नामपुरकर यांनी केले. यावेळी प्रशासक जी. श्रीकांत, शहर अभियंता ए.बी. देशमुख, उप संचालक नगर रचना मनोज गर्जे, कार्यकारी अभियंता यांत्रिकी अमोल कुलकर्णी, कार्यकारी अभियंता फारुख खान, वॉर्ड अभियंता झोन ०८ संजय कोंबळे व पालिकेचे अन्य अधिकारी, नाथ उद्योग समुह आणि नाथ सिडस् चे अधिकारी उपस्थित होते.

नाथ सिडस् कंपनीच्या जवळून वाहणाऱ्या नाल्याची लांबी सुमारे एक किलोमीटर आहे. या नाल्याच्या सौंदर्यीकरणाचा प्रस्ताव कंपनीतर्फे सादरीकरणाच्या माध्यमातून प्रशासकांसमोर मांडण्यात आला. सौंदर्यीकरण करताना नाल्यात कंपनीच्या माध्यमातून जाळी बंधारे बांधण्यात येणार आहेत, यामुळे नाल्यातून वाहून जाणारा कचरा थांबवला जाईल. सुमारे तीन हजार रोपांची लागवड करण्याचे



उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. जॉगिंग ट्रॅक, फुडकोर्ट आदी सुविधा उपलब्ध करुन देत या ठिकाणाला 'पिकनिक स्पॉट' मध्ये रुपांतरित करण्याचा मनोदय सादरीकरणाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आला. सौंदर्यीकरणानंतर या ठिकाणी तयार होणाऱ्या उद्यानाला 'संत एकनाथ उद्यान' असे नाव देण्याची कल्पना देखील यावेळी मांडण्यात आली.

या कामासाठी पुढील आठवड्यात महापालिका आणि नाथ सिडस् कंपनी यांच्यात सामंजस्य करार (एमओयु) करण्यात येईल असे संकेत यावेळी देण्यात आले. एमओयु करताना महापालिकेने नाल्याची हद्द ठरवून द्यावी अशी अपेक्षा कंपनीने व्यक्त केली. नाल्याच्या सौंदर्यीकरणाच्या कामासाठी महापालिका पीएमसी नियुक्त करेल त्याचे शुल्क नाथ उद्योग समुह देईल. 'माझे शहर, माझे उद्यान' या प्रकल्पांतर्गत हे काम करण्यात येईल.

या नाल्यावर विकेंद्रित मलजल प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) महापालिकेच्या माध्यमातून उभारण्याची तयारी प्रशासकांना दाखवली. एमओयु झाल्यावर पुढील काही दिवसात या प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकेल असे मानले जात आहे.

# बाल संस्कार वर्गाला मुलांचा प्रतिसाद;दर रविवारी आयोजन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेच्या वतीने समर्थ नगरमधील श्रीराम मंदिरात बाल संस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यात बालकांमध्ये संस्कार, आहार-विहार, व्यायाम, योगासह श्रीसमर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक तसेच श्रीसमर्थ रामदास स्वामींनी रचलेले श्रीमारुती स्तोत्र, त्रिकाल संध्या याचबरोबर श्रीज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान उपस्थित मुलांच्या मुखातून वदवून घेण्यात आले.

यानिमित्त चिन्मय संस्थानचे श्रीअपनेशानंद स्वामी व श्री समर्थ रामदास स्वामी अभ्यासक सुषमाताई धांडे यांनी उपस्थित मुलांना व पालकांना श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्याबद्दल मार्गदर्शन केले. मुलांनी दैनंदिन जीवनामध्ये कशाप्रकारे वर्तन असावे याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर चिन्मय संस्थांचे श्रीआत्मसानंद स्वामी यांच्या हस्ते श्रीरामाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी प्रास्ताविक केले. यामध्ये त्यांनी संस्थे अंतर्गत चालू असलेल्या वेगवेगळ्या अभियानाबद्दल माहिती दिली. संस्थेचा मुख्य उद्देश श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कार्यांचा प्रचार व प्रसार करणे हा आहे, असे यावेळी त्यांनी सांगितले.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत राजुरकर यांनी, तर आभार प्रदर्शन सहसचिव प्रकाश सनान्से यांनी केले. दरम्यान, चिन्मय संस्थेचे श्रीआत्मेशानंद स्वामी यांचा सत्कार संस्थेचे संपर्कप्रमुख नरेश देवळे व संस्थेचे पदाधिकारी गजानन देशमुख व सुधीर पोतदार यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन केले. उपस्थित मुलांना संस्थेतर्फे खाऊ वाटप करण्यात आला. प्रत्येक मुलाला श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांचे पुस्तके देण्यात आली. यावेळी मुलांसह त्यांचे पालक उपस्थित होते उपस्थित होते. संस्थेअंतर्गत हा बाल संस्कार वर्ग यानंतर प्रत्येक रविवारी ८.३० ते ९.३० यावेळेत समर्थनगरमधील श्रीराम मंदिरात घेतला जाईल. जास्तीत जास्त मुलांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांनी सर्वांना केले.

# आरोग्य विभागातर्फे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

कुटुंब नियोजन ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाच्या वतीने आजपासून (दि.२१) ते बुधवार दि.४ डिसेंबर या कालावधीत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा राबविण्यात येत आहे. पुरुष नसबंदी विषयी जनजागृती करणे, लोकांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवुन देणे, स्त्रीयांप्रमाणे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याची जबाबदारी ही पुरुषांची सुद्धा आहे, या विषयी माहिती देऊन समुपदेशन करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

हे अभियान दोन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात दि.२१ ते दि.२७ नोव्हेंबर दरम्यान लाभार्थ्यांशी संपर्क साधणे. त्यांना पुरुष नसबंदीचे महत्व पटवून देणे व



प्रवृत्त करणे, योग्य जोडप्यांच्या याद्या तयार करणे.ज्यांनी यापुर्वी पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केली आहे.अशा लाभार्थ्यांमार्फत मोहीमेचा प्रचार व प्रसार करुन माहीती देण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात दि.२८ नोव्हेंबर ते दि.४ डिसेंबर 'सेवा आठवडा' म्हणुन राबविण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा व तालुकास्तरीय लाभार्थ्यांचे शस्त्रक्रियेसाठी पूर्व नोंदणी करुन शिबिरे आयोजित करण्यात येतील. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असुन लाभार्थ्यास १ हजार ४५१ रु. प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.या अभियानात जास्तीत जास्त पुरुषांनी नसबंदी शस्त्रक्रिया करुन घ्यावी,असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.बाळकुष्ण लांजेवार यांनी केले आहे.

## २०१९ पेक्षा २०२४ निवडणुकीची टक्केवारी वाढली


# जिल्हाधिकारी यांनी या सर्वांचे मानले आभार

२०१९ विधानसभा आकडेवारी....

| Sr. No | Name Of the ACs | Turnout in Assembly Election 2019 | State Average Assembly Election 2019 |
|---|---|---|---|
| 1 | 216 - Akole (ST) | 68.20 | 61.44% |
| 2 | 217 - Sangamner | 71.72 | |
| 3 | 218 - Shirdi | 70.67 | |
| 4 | 219 - Kopargaon | 76.23 | |
| 5 | 220 - Shrirampur (SC) | 63.93 | |
| 6 | 221 - Newasa | 80.07 | |
| 7 | 222 - Shevgaon | 65.65 | |
| 8 | 223 - Rahuri | 68.37 | |
| 9 | 224 - Parner | 70.23 | |
| 10 | 225 -Ahmednagar City | 58.28 | |
| 11 | 226 - Shrigonda | 67.66 | |
| 12 | 227 - Karjat- Jamkhed | 73.94 | |
| Total | | 69.42 | |



२०२४ विधानसभा निवडणुकीत आकडेवारी....



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**


जिल्ह्यातील मतदारांनी मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील मतदारांचे अभिनंदन केले आहे आणि त्यांना धन्यवादही दिले आहेत. लोकशाहीच्या या उत्सवात मतदारांचा सहभाग कौतुकास्पद आहे. लोकशाही बळकट करून जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी हा सहभाग महत्वाचा ठरेल असे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासनातर्फे आयोजित विविध उपक्रमात सहभागी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, पोलीस, शिक्षण आणि शासनाचे विविध विभाग, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्यांचे सहकारी, विविध विभागांचे अधिकारी, माध्यम प्रतिनिधी, कर्मचारी, सामाजिक - शैक्षणिक संस्था, नागरिक यांनादेखील जिल्हाधिकाऱ्यांनी धन्यवाद दिले आहेत. सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून जिल्ह्याने ७२.७४ टक्के मतदान शक्य झाले असे श्री. सालीमठ यांनी म्हटले आहे. विशेष २०१९ विधानसभा निवडणुकी पेक्षा २०२४ मतदानाची टक्केवारी वाढली असल्याचे दिसून येते आहे.

# विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पार पडणार आहे. यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे मतमोजणी निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

अकोले विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक हौलिनलाल गौईटे (संपर्क अधिकारी - उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता प्रदिप हापसे - ७३५००७८८७७), संगमनेरसाठी सुनिल सिंग (संपर्क अधिकारी - उर्ध्व प्रवरा उपविभाग कार्यकारी अभियंता कैलास ठाकरे - ९४०४०७३७३९), शिर्डीसाठी कविथा रामू (संपर्क अधिकारी - सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे - ७२१८४८०३२२), कोपरगावसाठी शेरी (संपर्क अधिकारी - रचना सहायक किरण जोशी - ९८५०१७८७९५), श्रीरामपूरसाठी अरूण कुमार (संपर्क अधिकारी - मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलम



- ८४२५९२४४३३) आणि नेवासा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून जे.एल.बी.हरि प्रिया (संपर्क अधिकारी - विस्तार अधिकारी बी.के.कासार - ७७७४०४७९७९) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शेवगाव विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून श्रीमती रंजिता (संपर्क अधिकारी - मुळा पाटबंधारे कार्यकारी अभियां सायली पाटील व धनश्री शिंदे- ९७६४५६४४५५), राहूरीसाठी केशव हिंगोनिया (संपर्क अधिकारी - सहायक प्राध्यापक आर.आर.निरगुडे - ७५८८६०४१५१), पारनेरसाठी सुरेंदर सिंग (संपर्क अधिकारी -कुकडी पाटबंधारे श्री.घोरपडे - ९२२५५४४३३१), अहमदनगर शहरसाठी ताय काये (संपर्क अधिकारी - सहायक अभियंता संदिप कुंभार - ९५५२१३४७८५), श्रीगोंदासाठी डी रथना (संपर्क अधिकारी सहायक गटविकास अधिकारी विजय गायकवाड - ९०११८४५५२९, उपविभागीय अभियंता बबन वाळके - ९४२२३३५५१२, पुरवठा निरीक्षक - ८७८८४२०८५६) आणि कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी मतमोजणी निरीक्षक म्हणून पुजा यादव (संपर्क अधिकारी - मुख्याधिकारी अजय साळवे - ८४८३८४८५३७, पुरवठा निरीक्षक वृषाली जाधव- ७३८७४०६९७२) यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती निवडणूक निरीक्षक समन्वयक अधिकारी दीपक दातीर यांनी दिली आहे.

# स्वामी वैष्णवानंद पुण्यतिथी निमित्त मांजरम येथे धार्मिक,सांस्कृतिक कार्यक्रम

## चंद्रकांत महाराज लाठकराचे कीर्तन ,बाल गायिका विरा हाके चे गायन

**नायगाव । प्रतिनिधी**

मांजरम ता. नायगाव येथील स्वामी वैष्णवानंद यांच्या संस्थानात दरवर्षीप्रमाणे स्वामी वैष्णवानंद यांच्या पुण्यतिथी निमित्त २६,२७ व २८ नोव्हेंबर रोजी सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन . यानिमित्ताने नामवंत कीर्तनकार, प्रतिभावान कलावंत, सहभागी होणार आहेत या साठी जय्यत तयारी चालू आहे अशी माहिती स्वामी चे वंशज बाळासाहेब पांडे मांजरमकर यांनी दिली.

दी.२६ नोव्हेबर मंगळवार रोजी सकाळी स्वामींच्या समाधीचे पूजन, रात्री ७ वाजता वे.शा.सं. रमेश गुरु राहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक सोहळा, रात्री ९ ते १२ विठ्ठलेश्वर भजनी मंडळ, जिजामाता महिला भजनी मंडळ, महात्मा बसवेश्वर भजनी मंडळ, हनुमान सेवा दल, गुरुदेव सेवा,नागेश्वर भजनी मंडळ, आदी भजनी मंडळ मांजरम यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे.


२७ नोव्हेंबर बुधवारी स्वामीच्या पुण्यतिथीचा सोहळा, सकाळी प्रा. भूषण कुलकर्णी व श्रीनिवास पांडे यांच्या हस्ते समाधी पूजन, दुपारी १ ते ३ स्वामीच्या पुण्यतिथीचा सोहळा वैदीय कार्यक्रमाने साजरा होईल. या मध्ये वे.शा.सं. रमेश गुरु राहेरकर, धनजय गुरू कापसीकर, संतोष महाराज राहेरकर, उमेश गुरु नायगावकर, बाळासाहेब कुलकर्णी बरबडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैदिक विधी सपंन होणार आहे. दुपारी ३ ते ४ महंत विशुदधानंद महाराज सिधतिर्थ धाम यांचे प्रवचन व दर्शन सोहळा, या नंतर ह.भ.प.बाबू गुरु शिराढोणकर यांचे स्वामीच्या गुलालाचे भजन, त्यांना हार्मोनियमची साथ अनंतराव मंगनाळे, गायन सुधाकर कुलकर्णी चोराखळीकर, भाग्यश्री बाळासाहेब पांडे, विनायक पा. शिंदे, विकास भूरे,परमेश्वर केते,गोविंद वरर्टी ,तबला साथ हरिप्रसाद बाळासाहेब पांडे मांजरमकर, मृदंग साथ बालू महाराज पांडे यांची राहणार आहे.

सायंकाळी ७ ते ९ अनेक पुरस्कार प्राप्त बाल गायिका कु.विरा गणेश हाके हीचे भजन संध्या कार्यक्रम होणार आहे,पेटीची साथ गणेश हाके, गायन सरस्वती हाके.रात्री ९ ते ११ विनोदाचार्य ह.भ.प.चंद्रकांत महाराज लाठकर यांचे हरिकीर्तन, रात्री ११ ते १२ अभिषेक संजय देशपांडे व हरिप्रसाद पांडे यांचे तबलावादन, १२ ते १ दरम्यान नृत्यकलावंत मास्टर आशिष सगरोलीकर यांचा भारूड, गवळण,देशभक्तीपर गीत व धार्मिक गीतावर आधारित नृत्याविष्कार कार्यक्रम,नंतर भजनसम्राट विश्वनाथ भोगले यांचा 'भजनसंध्या' कार्यक्रम साजरा होणार आहे.

रात्री संगीत भजन होणार असून यामध्ये ह .भ. प.मारोती महाराज मांजरमकर फलटण,संगीत अलंकार प्राप्त शंकर बिरादार, प्रा. माधव किन्हाळकर,गणेश हाके,नामदेव पांचाळ, बालाजी पेटेकर, भाग्यश्री बाळासाहेब पांडे, त्र्यंबक स्वामी, पवन गादेवार, विष्णू तांदळीकर, बालाजी चौधरी, शरद पा. कोलंबीकर, शंकर पाटील मुगावकर, श्याम पाटील नरंगलकर ,रमेश जाधव या सह खैरगाव, नरंगल,कोलंबी,मोकसदरा,येथील भजनी मंडळ ,आदी कलावंत हजेरी लावणार आहेत.

तबला- नामदेव पांचाळ, मृदंग- ऋषिकेश बेळीकर , अमोल लाकडे, ढोलक -ज्ञानेश्वर बैस, ट्रीबलसाथ -प्रसाद पांडे, बासरीवादन विजय द्रोणाचार्य, हार्मोनियम मारोती कोंडामंगल यांची साथ राहणार आहे.

दी.२८ नोव्हेंबर गुरुवार रोजी सकाळी ७ वाजता वे.शा.सं. संतोष गुरु राहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेदांत राहेरकर यांचा स्वामीच्या समाधीला अभिषेक, नंतर स्वामीच्या पादुका व प्रतिमा यांची मांजरम नगरीतून मुख्य रस्त्यावर पालखी मिरवणुकीचा सोहळा होणार आहे. सकाळी १० वा. स्वामीचे वशंज हरिप्रसाद पांडे, अर्णव वैभव देसाई आजनिकर यांच्या हस्ते दहीहंडी फोडून काल्याच्या प्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.



## एकनाथ शिंदे-शरद पवार एकत्र येणार?

# शिंदे नेहमीच योग्य दिशेने जातात,आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ-संजय शिरसाट



**मुंबई (वृत्तसंस्था)**-विधानसभा निवडणुकीतील जनतेचा कौल मतदान यंत्रामध्ये बंद झाल्यानंतर आता राज्यात कुणाची सत्ता येणार? याविषयी विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संभाव्य युतीचे संकेत दिलेत. यामुळे निवडणूक निकालानंतर राज्याच्या राजरकारणात मोठ्या घडामोडी घडण्याची चिन्हे आहेत.

**संजय शिरसाट यांच्या दाव्याने भाजपमध्ये खळबळ:मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शरद पवार यांच्यासोबत जाणार नसल्याचे केले तातडीने स्पष्ट**

संजय शिरसाट यांनी मंगळवारी सकाळी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यात पत्रकाराने त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेनेच्या संभाव्य युतीविषयी प्रश्न केला. त्याला उत्तर देताना संजय शिरसाट यांनी यासंबंधीचा कोणताही निर्णय एकनाथ शिंदे हेच घेतील असे स्पष्ट केले. शरद पवार यांच्यासोबत जायचे की नाही? याचा निर्णय एकनाथ शिंदेच घेतली. आम्हाला त्यावर भाष्य करता येणार नाही. पण शिंदे साहेब नेहमीच योग्य दिशेने जात असतात असा आमचा आतापर्यंतचा अनुभव आहे. आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ. ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल.एकनाथ शिंदे यांच्या प्रत्येक निर्णयाला आम्ही त्याला बांधिल आहोत. ते जिकडे जातील तिकडे आम्ही त्यांच्यासोबत जाऊ. आम्ही त्यांच्यासोबत अत्यंत मजबुतीने राहू, असे संजय शिरसाट म्हणाले.ते पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित आहे. निवडणूक निकालानंतर महायुतीचे नेते एकत्र बसून मुख्यमंत्री कोण हे ठरवतील. ७५ टक्के सर्व्हे आमच्या बाजूने आहेत. आम्ही ही निवडणूक एकनाथ शिंदे यांच्या चेहऱ्यावर लढली. त्यामुळे शिंदेच हेच राज्याचे नवे मुख्यमंत्री होतील असा आम्हाला विश्वास आहे. यासंबंधी नितीश कुमार यांचे उदाहरण पाहता येईल. वरिष्ठ नेते यासंबंधी योग्य तो निर्णय घेतील. पण एकनाथ शिंदे ज्या भावनेने काम करतात ते जनतेला आवडले अशी सर्वसामान्यांची भावना आहे.

संजय शिरसाट यांनी तत्पूर्वी एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना कथित व्होट जिहादवर भाष्य केले. विरोधी पक्षांचा व्होट जिहाद सुरू होता. याऊलट आम्ही धर्मयुद्ध लढत होतो. आमचे धर्मयुद्ध सक्सेस झाले. बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है आदी घोषणा प्रचंड यशस्वी झाल्या. हिंदू बांधवांसह सर्वच जातीधर्माच्या लोकांनी महायुतीला पसंती दर्शवली. त्यामुळे या निवडणुकीत आमचाच विजय होईल हे निश्चित आहे. सरकारच्या योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी या सर्व बाबी आमच्या पथ्यावर पडणार आहेत. त्यामुळे मतांची वाढलेल्या टक्क्याचा कौल महायुतीच्याच बाजूने असेल आमचा दावा आहे, असे ते म्हणाले.

# राज्यात मविआचे सरकार येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ-पटोले

**मुंबई (वृत्तसंस्था)**-काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला. भाजप पैसा व दारू वाटून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांचा हा नोट जिहाद आहे की दारू जिहाद आहे? महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येणार असून, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असे ते म्हणाले.

नाना पटोले पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, महाराष्ट्रात काँग्रेसच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होईल. मतदानाची आकडेवारी व कल पाहता काँग्रेसचेच सर्वाधिक उमेदवार निवडून येतील. मविआचे सरकार येणार यावर कोणतेही दुमत नाही. ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. भाजप सरचिटणीस विनोद तावडे हे पैसे वाटताना पकडले गेले. त्यानंतर त्यांनी आपण चिठ्ठ्या वाटण्यासाठी गेल्याचा दावा केला. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस चिठ्ठ्या वाटत असतील तर ही फार दुर्दैवी गोष्ट आहे. यावरून त्यांच्याकडे आता कार्यकर्तेच राहिले नसल्याचे स्पष्ट होते.आता हे लोक कितीवेळा खोट्यावर खोटे बोलणार? देवेंद्र फडणवीस यांचे पीए तथा आर्वी विधानसभेचे भाजपचे उमेदवार सुमीत वानखेडे यांच्या वर्धा येथील गोदामात दारूच्या बाटल्या सापडल्या. वर्धा हा दारुबंदीचा जिल्हा आहे. दारू व पैसा वाटून हे लोक मतदान मागण्यासाठी नोट जिहाद करत आहेत का? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. भाजप घटनात्मक व्यवस्थेला मानत नाही. काँग्रेस नेहमीच असा आरोप करते. कुणी कुणाला मतदान करावे हा ज्याचा त्याचा अधिकार



आहे. पण त्याला हे लोक व्होट जिहाद म्हणतात.महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाने भाजपला मतदान देण्याचा निर्णय घेतला. याला ब्राह्मण जिहाद म्हणता येईल का? काय सुरू आहे महाराष्ट्रात? मतदान हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे. त्या अधिकाराचे हनन करता येणार नाही. भाजप आज पैसा व दारू वाटून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत आहे. हा नोट जिहाद आहे की दारू जिहाद आहे? असे नाना पटोले म्हणाले.

पत्रकारांनी यावेळी नाना पटोले यांना महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री होणार का? असा थेट प्रश्न केला असता त्यांनी सकारात्मक प्रत्युत्तर दिले. महाराष्ट्रात निश्चितपणे महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री होईल. राज्यात आमचेच सरकार येईल, असे ते म्हणाले.उल्लेखनीय बाब म्हणजे महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी झालेल्या मतदानात सरासरी ६५ टक्के मतदान झाले. आता शनिवारी मतमोजणी होणार असून, त्यानंतर राज्यात कुणाचे सरकार येणार हे स्पष्ट होणार आहे.

## बहुमत असो किंवा नसो, अपक्षांना सोबत घेणार:भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांचा दावा;लाडक्या बहिणींच्या मतदानावर विश्वास

**नागपूर (वृत्तसंस्था)**-राज्यात मतांचा टक्का वाढला आहे. राज्यातील लाडक्या बहिणी आणि शेतकऱ्यांनी आम्हाला मोठ्या प्रमाणात मतदान केले असल्याचा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. वाढलेल्या मतदानाचा आम्हाला फायदा आम्हाला होईल, असा दावा देखील बावनकुळे यांनी केला आहे. राज्यात महायुतीला बहुमत मिळाले तरी किंवा नाही मिळाले तरी सत्ता स्थापन करताना अपक्षांना सोबत घेणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. राज्यात महायुती पुन्हा सत्ता स्थापन करेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राज्यात बहुमता पेक्षा जास्त आमदार आमचे निवडून येतील, असे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे. आम्हाला सत्ता स्थापनेसाठी अपक्ष आमदारांची गरज भासली तरी त्यांची मदत घेणार आणि गरज भासली नाही तरी देखील त्यांची मदत घेतली जाणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. निवडून आलेला आमदार हा लोकांचा प्रतिनिधी असतो. निवडून आल्यानंतर त्याच्या मतदारसंघात विकासाची कामे होणे आवश्यक आहे. त्यामुळे



बहुमत असले किंवा नसले तरी अपक्ष आमदार विकासासाठी भारतीय जनता पक्षाच्या बाजूने राहतील असा दावा देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे. त्यामुळे राज्यात देखील डबल इंजिनचे सरकार हवे, असे महाराष्ट्रातील जनतेचे मत आहे. त्यामुळे राज्यात महायुती सरकार येणार असल्याचा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. राज्यभरातील लाडक्या बहिणींनी आम्हाला मोठ्या प्रमाणात मतदान केले असल्याचा दावा देखील बावनकुळे यांनी केला आहे.

### संजय शिरसाट यांच्या दाव्याने भाजपमध्ये खळबळ

## एकनाथ शिंदे शरद पवारांसोबत जाणार नाहीत;प्रवीण दरेकरांनी तातडीने केले स्पष्ट

**मुंबई (वृत्तसंस्था)**-विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत जाणार असल्याचा दावा भाजपने जोरकसपणे फेटाळून लावला आहे. एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीविरोधात निवडणूक लढवली आहे. त्यामुळे ते त्यांच्यासोबत जातील अशी कोणतीही शक्यता नाही. आमदार संजय शिरसाट यांनी यासंबंधी मांडलेली भूमिका त्यांच्या पक्षाची नाही, असे भाजपने म्हटले आहे.विधानसभा निवडणुकीतील जनतेचा कौल मतदान यंत्रामध्ये बंद झाला आहे. आता राज्यात कुणाची सत्ता येणार? याविषयी विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संभाव्य युतीचे संकेत दिलेत. यामुळे महायुतीच्या गोटात खळबळ माजली असताना भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी शिरसाट यांचा दावा धुडकावून लावला आहे.प्रवीण दरेकर म्हणाले की, संजय शिरसाट यांची भूमिका ही काही त्यांच्या पक्षाची अधिकृत भूमिका आहे असे मला वाटत नाही. त्यांच्या पक्षाची ही अधिकृत भूमिका असती तर मी त्यावर भाष्य केले असते. तथापि, मला असे काही घडेल असे अजिबात वाटत नाही.एकनाथ शिंदे यांनी शरद पवार व महाविकास आघाडीच्या विरोधात निवडणुका लढवल्या आहेत. उद्धव ठाकरे यांच्याविरोधातही लढवल्या आहेत. त्यामुळे त्यांनी ज्या विचारातून महायुती किंवा भाजपसोबत युती केली, ते पाहता अशा प्रकारची तिळमात्रही गोष्ट होऊ शकत नाही असा माझा ठाम विश्वास आहे, असे प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे संजय शिरसाट यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना एकनाथ शिंदे व शरद पवार यांच्यातील संभाव्य युतीवर भाष्य केले होते. पत्रकारांनी याविषयी त्यांना छेडले असता ते म्हणाले होते की, शरद पवार यांच्यासोबत जायचे की नाही? याचा निर्णय एकनाथ शिंदेच घेतली. आम्हाला त्यावर भाष्य करता येणार नाही. पण शिंदे साहेब नेहमीच योग्य दिशेने जात असतात असा आमचा आतापर्यंतचा अनुभव आहे. आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ. ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल.एकनाथ शिंदे यांच्या प्रत्येक निर्णयाला आम्ही त्याला बांधिल आहोत. ते जिकडे जातील तिकडे आम्ही त्यांच्यासोबत जाऊ. आम्ही त्यांच्यासोबत अत्यंत मजबुतीने राहू, असे ते म्हणाले होते.

# राज्यात महाविकास आघाडीचेच सरकार येणार-जितेंद्र आव्हाड

**मुंबई (वृत्तसंस्था)**-एक्झिट पोलचे अंदाज काहीही असले तरी महाराष्ट्रात महाविकास आघाडीचेच सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील जनतेला सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांची मुजोरी आवडलेली नाही. त्यामुळे मविआचे १६० हून अधिक आमदार निवडून येतील, असे ते म्हणालेत.



महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी बुधवारी मतदान झाले. त्यानंतर जारी झालेल्या एक्झिट पोलमध्ये सत्ताधारी महायुतीला अनुकूल वातावरण असल्याचा दावा करण्यात आला. जितेंद्र आव्हाड यांनी गुरुवारी त्यावर भाष्य करताना राज्यात कोणत्याही स्थितीत महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

ते म्हणाले, जनतेला महायुती सरकारच्या नेत्यांना आलेली मुजोरी आवडलेली नाही. वहिणींना बारामतीत थांबवणे, दाराबाहेर उभे करणे, अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक करून त्यांचे डोके फोडणे, जागोजागी पैसे वाटणे, विनोद तावडें सारख्या मोठ्या नेत्यांजवळ ५ कोटी मिळणे यासारख्या गोष्टी जनेतला आवडणाऱ्या नाहीत.

शरद पवारांनी अवघी बारामती घडवली. पण त्यांच्याच पत्नीला दाराबाहेर मॉलच्या थांबवण्यात आले. त्यांना आतमध्ये प्रवेश देण्यात आला नाही. हे कोणत्या कायद्यात बसते? आता माणुसकीचा लवलेश नसणारी माणसे राजकारणात आली आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचे सर्व भागातील आमदार निवडून येतील. त्यांची संख्या १६० च्या वर असेल.जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी मुख्यमंत्रीपदावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावरही निशाणा साधला. प्रत्येकाला आपण मुख्यमंत्री व्हावे असे वाटते. सर्वांना तशी हौस असते. असे बोलल्याने ५ मिनिटांचा आनंद मिळतो. काही जण त्याचा आनंद घेतात. मी मुख्यमंत्री होणार असे म्हटल्याने मलाही आनंद मिळतो, असे ते उपरोधिकपणे नाना पटोले यांना टोला हाणताना म्हणाले.एकनाथ शिंदे काय होणार? देवेंद्र फडणवीस काय होणार? याच्याशी आम्हाला कोणतेही देणेघेणे नाही. आमच्या मुख्यमंत्री होत असताना आम्ही त्यांचा पाहण्यास कशाला जावे? राज्यात सत्ता परिवर्तन होणार असून, महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे, असे ते म्हणाले.

# माझ्याकडे १ पैसाही सापडला नाही:नालासोपारा येथील घटनेमागे भाजपचा कोणताही नेता नाही, तावडेंनी फेटाळला विरोधकांचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**-भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी बुधवारी नालासोपारा येथे घडलेल्या घटनेमागे कोणतेही कट कारस्थान नसल्याचा दावा केला आहे. काल मी नालासोपारा येथे जाणार असल्याची माहिती भाजपच्या कोणत्याही नेत्याला नव्हती. मी अचानक तिथे गेलो होतो. त्यामुळे त्या घटनेमागे काही कारस्थान असल्याचा आरोप चुकीचा आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

विनोद तावडे यांना मंगळवारी विरार पूर्वच्या मनोरीपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये कथितपणे पैसे वाटताना पकडण्यात आले होते. त्यानंतर खासदार संजय राऊत यांच्यासह अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांनी ही घटना भाजपच्याच अंतर्गत राजकारणातून घडल्याचा दावा केला होता. तसेच या प्रकरणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अंगुलीनिर्देश केला होता. या पार्श्वभूमीवर विनोद तावडे यांनी बुधवारी आपला मताधिकार बजावल्यानंतर आपली बाजू स्पष्ट केली.विनोद तावडे म्हणाले, मी नालासोपारा इथे जाणार हे भाजपमधील कोणत्याच नेत्याला ठावूक नव्हते. कारण, वाड्याहून परत येताना मी उमेदवार राजन नाईक यांना फोन केला. त्यांच्याकडून मतदारसंघातील स्थितीची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी मी कार्यकर्त्यांसोबत असल्याचे सांगितले. तसेच मला चहासाठी येण्याचीही विनंती केली. मला वाटले तिथे १०-१२ जण असतील असा विचार करून तिथे गेलो.त्यामुळे यात कुणाचेही कट कारस्थान नाही. आपसातील वाद नाही किंवा इतर कोणतेही कारण नाही. माझ्या मते, विरोधी पक्षांना आपला पराभव डोळ्यापुढे दिसत असल्यामुळे त्यांनी एका राजकीय घटनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. पोलिस किंवा निवडणूक आयोगाला काहीच मिळाले नाही. त्यानंतरही असे म्हणणे हे चुकीचे आहे. माझ्याकडे एक पैसाही सापडला नाही. त्यामुळे हे प्रकरण दाबण्याचा प्रश्नच येत नाही, असे ते म्हणाले.विनोद तावडे यांनी यावेळी आपल्यावर विश्वास दाखवल्याबद्दल शरद पवारांचेही आभार मानले. शरद पवार एक समंजस नेते आहेत. ते खूप ज्येष्ठ आहेत. ते मला खूप जवळून ओळखतात. त्यामुळे असा प्रकार मी करू शकत नाही हे त्यांना चांगलेच ठावूक आहे, असे ते म्हणाले.ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या कॅशकांडामागे राज्याचे गृहमंत्री अर्थात देवेंद्र फडणवीस असल्याचा आरोप केला आहे. याविषयी पत्रकारांनी पुन्हा एकदा विनोद तावडे यांना छेडले असता त्यांनी संजय राऊत खोटे बोलत असल्याचा दावा केला. संजय राऊत खोटे बोलत आहे. चुकीचा दावा करत आहेत. मी तिथे जाणार आहे हे केवळ मलाच माहिती होते. केवळ २ मिनिटांत हा कार्यक्रम ठरला होता. माझे तिथे जाणे अचानक झाले. त्यामुळे या आरोपांत कोणतेही तथ्य नाही, असे तावडे म्हणाले.

विनोद तावडे यांनी यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या निवडणुकीत बिटकॉईन वाटपाच्या मुद्यावरही भाष्य केले. ते म्हणाले, माझ्या मते ज्या गोष्टी आपल्याला माहिती नाहीत, त्या ऑथेंटिक गोष्टी आमच्या सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितल्या आहेत. सुधांशु त्रिवेदी ठोस माहिती असल्याशिवाय पत्रकार परिषद घेत नाहीत. सुप्रिया सुळे यांनी आपले म्हणणे मांडले आहे. त्यांनी चौकशीची मागणी केली आहे. पुढे चौकशी होईल व त्यातून वस्तुस्थितीही समोर येईल.सुप्रिया सुळे यांनी काल माझ्याविषयी काल माझ्याकडे ५ कोटी असल्याचे खोटे विधान केले. परंतु माझ्याकडे एक पैसा मिळाला नाही. त्यामुळे सुप्रिया सुळेंनी माझे ५ कोटी मला परत करावे, असेही विनोद तावडे यावेळी बोलताना म्हणाले.बहुजन विकास आघाडीच्या आरोपानुसार, भाजप सरचिटणीस विनोद तावडे मंगळवारी विरार पूर्वच्या मनोरीपाडा येथील विवांत हॉटेलमध्ये आले होते. त्यांच्यासोबत भाजप उमेदवार राजन नाईक व भाजपचे काही पदाधिकारी होते. ते तिथे पैसे वाटत होते. त्यावेळी बविआचे काही कार्यकर्ते हॉटेलमध्ये आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077